**तक्रार (यु. एल. पी.) क्र.२१/२०२३.**
**नि.क्र.युडब्ल्यु—०१.**

**पुढील उलटतपास सामनेवालातर्फे नव्या शपथेवर श्रीमती चितापुरे वकील यांचेमार्फत सुरु,**

३. १९८२ साली सामनेवालेकडे माझेसोबत कामाला असलेल्या कामगारांपैकी कोणी कामगार माझेवतीने साक्ष देण्यास तयार असल्यास मी त्याला पुढील तारखेस माझा साक्षीदार म्हणून तपासण्यास तयार आहे. माझेसोबत यादी मध्ये असलेल्या इतर ५० मजूरांना सामनेवाले यांनी नोकरीत कायम केले नव्हते व नाही ते मला माहित नाही. हे खरे की प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल करण्यापूर्वी मला कायमपणाचे फायदे दयावे अशी मागणी करणारा तक्रार अर्ज मी दाखल केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मला वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्यानंतर कामावरुन कमी करण्यात आले आहे व त्यामुळे मी कामगार कायदयानुसार कुठलाही फायदा मिळण्यास पात्र नाही. हे खरे की, प्रस्तुतचा तक्रार अर्ज मी २००० सालापासून कामावर नसल्यानंतर सुमारे २२ वर्षानी दाखल केला आहे. हे खरे की, तक्रार अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचे कारण तक्रार अर्जात नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की सामनेवाले यांनी मला डावलून इतर कोणाही कर्मचा—यास सेवेत कायम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा अर्ज दाखल केला असून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी पूर्ण.**
**फेरतपासणी काही नाही.** **श्रवणोत्तर स्विकृत**

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA Date: 2024.04.20 13:25:53 +0530

( प्र. प्र. राजवैद्य )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक :— २०/०४/२०२४.
*माकम/—*